भारत सरकार मान्यताप्राप्त

दैनिक

# सोलापूरी झटका

Reg No. MAHMAR52974 dailysolapurizataka@gmail.com

मुख्य संपादक : विकास नारायण वाघमारे मो. ९४२३२३५८५५, ७२१९६५३२५५

वर्ष : १ ले | अंक : ८४ वा | गुरुवार ०६ ऑगस्ट २०२६ | PRGI No. MHMAR/26/A/2199 | किंमत ₹ ४.०० | पाने ४








# जिल्हा बँक रणसंग्रामाची चाहूल !

## विधानपरिषदेच्या धर्तीवरच रंगणार सोलापूर डीसीसी बँकेची निवडणूक, संजयमामा शिंदे चेअरमनपदाच्या शर्यतीत आघाडीवर ?

**सोलापुरी झटका न्यूज**
**सोलापूर / प्रतिनिधी :**

सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत ज्या प्रकारे शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय घडामोडींनी वेग घेतला, त्याच धर्तीवर आता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी बँक) निवडणुकीची रंगत वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जिल्ह्याच्या सहकार राजकारणाचे केंद्रबिंदू ठरणाऱ्या या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, आगामी सत्तासमीकरणात चेअरमनपदासाठी संजयमामा शिंदे यांचे नाव आघाडीवर असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. यावेळी त्यांना चेअरमनपदाची संधी मिळू शकते, अशी राजकीय वर्तुळात कुजबुज असून त्यावर विविध तर्कवितर्क रंगू लागले आहेत.दरम्यान, उमेदवारी निश्चित करण्यासाठी पुन्हा एकदा इच्छुकांची मुंबईकडे धावपळ सुरू होणार का? हा प्रश्नही चर्चेचा विषय ठरत आहे. मागील निवडणुकांप्रमाणे पक्षश्रेष्ठींच्या भेटी, लॉबिंग, राजकीय बैठका आणि शेवटच्या क्षणापर्यंत सुरू राहणारे प्रयत्न पुन्हा पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय निरीक्षक व्यक्त करत आहेत.यंदाची निवडणूक अनेक दिग्गज नेत्यांसाठी प्रतिष्ठेची ठरणार असून, पक्षश्रेष्ठींच्या निर्णयापुढे जिल्ह्यातील अनेक बड्या नेत्यांना वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून शिस्तीने वागावे लागणार, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या सत्तेभोवती नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत घडणाऱ्या हालचालींकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.आता सहकाराच्या या राजकीय आखाड्यात कोण बाजी मारणार, कोणाला उमेदवारी मिळणार आणि चेअरमनपदाची माळ अखेर कोणाच्या गळ्यात पडणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.




# गौडवाडी हादरली !

## रस्त्यात अडवून बेदम मारहाण

### हात फ्रॅक्चर,जिवंत सोडणार नाही ची धमकी




**सोलापुरी झटका न्यूज**
**सांगोला / प्रतिनिधी :**

सांगोला तालुक्यातील गौडवाडी येथे जुन्या वादातून एका तरुणावर भरदिवसा झालेल्या मारहाणीची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपींनी तरुणाला रस्त्यात अडवून शिवीगाळ, दमदाटी करत बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्याच्या डाव्या हाताला जोरात पिरगळून हिसका दिल्याने मनगटाजवळ फ्रॅक्चर झाल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले आहे. तसेच यापुढे नीट राहा, नाहीतर जिवंत सोडणार नाही, अशी धमकीही दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.फिर्यादी लक्ष्मी बाळू गडदे (रा. गौडवाडी, ता. सांगोला) यांनी सांगोला पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा ओंकार बाळू गडदे हा २ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कामावरून घरी येत असताना गौडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेसमोरील रस्त्यावर त्याला अडविण्यात आले.यावेळी ज्ञानेश्वर शिवाजी गडदे व बिरा बाळू गडदे यांनी मागील वादाचा राग मनात धरून ओंकारला शिवीगाळ करत मारहाण केली. फिर्यादीनुसार, ज्ञानेश्वर गडदे याने ओंकारच्या डाव्या हाताला जोरात पिरगळून हिसका दिला, तर बिरा गडदे यानेही लाथाबुक्यांनी मारहाण केली. मारहाणीनंतर दोघांनीही जीवे मारण्याची धमकी देत घटनास्थळावरून पलायन केल्याचे नमूद करण्यात आले आहे.मारहाणीनंतर जखमी ओंकारने आईला फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्याला तातडीने ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. एक्स-रे तपासणीत डाव्या हाताच्या मनगटाजवळ फ्रॅक्चर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या प्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात ज्ञानेश्वर शिवाजी गडदे व बिरा बाळू गडदे, दोघेही रा. गौडवाडी, यांच्याविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# पाणी प्रश्नावरून वरून राजकारण तापलं !

## निवेदनांचा पाऊस; पण माण-कोरडा अजूनही कोरडीच, शेतकऱ्यांमध्ये संतापाचा उद्रेक




**सोलापुरी झटका न्यूज**
**सांगोला / प्रतिनिधी :**

सांगोला तालुक्यात दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असताना टेंभू, म्हैसाळ व नीरा उजवा कालवा योजनांमधील अतिरिक्त पाणी माण व कोरडा नदीपात्रात सोडण्याच्या मुद्द्यावर राजकारण चांगलेच तापले आहे. एकीकडे विविध नेतेमंडळी पाणी आणल्याचे श्रेय घेण्यासाठी स्पर्धा करत असल्याचे चित्र आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्षात नदीपात्र अद्याप कोरडेच असल्याने शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा, कोयना, पंचगंगा, नीरा आदी नद्यांना महापूर आला असून लाखो क्यूसेस पाणी समुद्रात वाहून जात आहे. मात्र दुष्काळी सांगोला तालुक्यात अपेक्षित पाऊस नसल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. अनेक भागांत पिके करपू लागली असून जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.दरम्यान, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाच नंबर फाटा, माण नदी, कोरडा नदी व लाभक्षेत्रात वाढीव क्षमतेने पाणी सोडण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर माजी आमदार दीपक आबा साळुंखे-पाटील यांच्या प्रयत्नांमुळेही हालचालींना वेग आल्याचा दावा करण्यात येत आहे. तसेच महायुती सरकार टेंभू-महेश्वरचे पाणी माण नदीत सोडण्यासाठी कटिबद्ध असल्याचा दावा सभापती चेतनसिंह केदार यांनी केला आहे.मात्र, या सर्व दाव्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाने वेगळाच सवाल उपस्थित केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून विविध राजकीय पक्ष, संघटना व नेत्यांकडून निवेदनांचा सपाटा सुरू आहे. पत्रकार परिषद, आंदोलने आणि श्रेयवादाचे राजकारण सुरू असतानाही प्रत्यक्षात माण आणि कोरडा नदीपात्रात पाणी पोहोचलेले नाही. त्यामुळे श्रेयाची लढाई सुरू आहे; पण पाणी कुठे? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिके वाळू लागली असून विहिरी, तलाव आणि बंधारे तळ गाठत आहेत. जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत प्रत्यक्षात नदीपात्रात पाणी सोडून शेवटच्या टोकापर्यंत पोहोचविणे हीच खरी गरज असल्याचे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.

राजकीय स्तरावर मात्र पाणीप्रश्नावर श्रेयवाद अधिक तीव्र होताना दिसत आहे. विविध नेते आपल्या प्रयत्नांमुळेच पाणी येणार असल्याचा दावा करीत असले तरी प्रत्यक्षात परिस्थितीत बदल झालेला नसल्याने शेतकरी वर्गामध्ये नाराजी वाढत आहे.

> * श्रेय कुणाचे?' पेक्षा पाणी कधी? हा शेतकऱ्यांचा सवाल *
>
> * पाच नंबर फाटा, माण व कोरडा नदीत पाणी सोडण्याचे आदेश असल्याचा दावा.* विविध नेत्यांकडून पाठपुरावा व श्रेयवादाची स्पर्धा. प्रत्यक्षात अनेक भागांत नदीपात्र अजूनही कोरडे. खरीप पिके धोक्यात; जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर.* घोषणांपेक्षा प्रत्यक्ष पाणी द्या, अशी शेतकऱ्यांची मागणी.

# शाहिर जमदाडे यांना राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार प्रदान



**सोलापुरी झटका न्यूज**
**नांदेड / प्रतिनिधी :**

अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स नांदेड द्वारा दिला जाणारा छत्रपती राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार लोकराजा छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते गीत मोह सांस्कृतिक कला मंच शिराढोण तालुका कंधार जिल्हा नांदेड संस्थापक अध्यक्ष शाहीर बापूराव जमदाडे शिराढोणकर यांना त्यांच्या सांस्कृतिक,शैक्षणिक,सामाजिक व इतर महत्त्वपुर्ण प्रबोधनाच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. प्रामुख्याने ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ. जे.टी.जाधव,मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, पूज्य भंतेजी पयाबोधी,प्रा.डॉ. सुनील चंद्र सोनकांबळे,लॉर्ड बुद्धा टी.व्ही.महाराष्ट्राचे मुख्य चीफ संवाददाता प्रा.डॉ.गजेंद्र गवई, आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार पी.एस.गवळे,कार्यक्रमाचे उद्घाटक सय्यद मुजीब भाई,अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे प्रदेशाध्यक्ष डी.एस.वाघमारे,भीम कायदा सामाजिक संघटना जिल्हाध्यक्ष विलास दादा गजभारे,राहुल प्रतिष्ठानचे अध्यक्ष पि.डी.झडते, राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानचे प्रा.जे.जी.हनमंते,पत्रकार संभाजी सोनकांबळे,सरपंच एम.एन.गवळे, पत्रकार संजय निळेकर,नांदेड आकाशवाणी निवेदक बालाजी गवारे,दै.वीर शिरोमणी वर्तमान पत्राचे संपादक शंकर सिंह ठाकूर, दैनिक वीर शिरोमणी नांदेड जिल्हा प्रतिनिधी ड.सुजाता पोहरे व अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे व इतर सर्व प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार बापुराव जमदाडे यांना प्रदान करण्यात आला.

पान नं २ वर...

# आरोग्य अधिकाऱ्यांची मनमानी !

## परवानगीशिवाय पुणे दौरा, नोटीसचे आदेश

**सोलापुरी झटका न्यूज**
**सोलापूर / प्रतिनिधी :**

जिल्हा परिषद सोलापूरच्या स्थायी समितीच्या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांच्या गैरहजेरीवरून चांगलाच वाद रंगला. अध्यक्ष तथा सभापती दीपक अरुण वैद्य यांनी स्पष्ट परवानगी नाकारल्यानंतरही डॉ. कोपूरवाड पुण्यातील बैठकीस गेल्याने संतप्त झालेल्या अध्यक्षांनी त्यांच्या विरोधात कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश देत प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय सर्वाधिक गाजला.जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात झालेल्या या बैठकीत जिल्ह्याच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विकासकामांची गुणवत्ता, निधीचा पारदर्शक वापर, नागरिकांना दर्जेदार सेवा आणि विभागांतील समन्वय यावर विशेष भर देण्यात आला. ११ तालुक्यांत ११ आदर्श शाळांचा संकल्प शिक्षण विभागाच्या आढाव्यात प्रत्येक तालुक्यात एक अशा ११ आदर्श शाळा उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.यावेळी सदस्य पृथ्वीराज माने यांनी नेहरूनगर येथील जिल्हा परिषदेच्या अंडी उबवणूक केंद्राच्या मोठ्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्या ठिकाणी जिल्हा औषध भांडार व इतर शासकीय कार्यालये उभारण्याची सूचना केली.सदस्य उंबरजे यांनी शालेय पोषण आहाराचा दर्जा सुधारण्याबरोबरच जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली.सदस्य दादा लवटे यांनी बचत गटांमार्फत वितरित करण्यात आलेल्या शालेय गणवेशाच्या निकृष्ट गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संपूर्ण चौकशी करण्याची मागणी केली. आरोग्य विभागावर संताप आरोग्य विभागाच्या आढाव्यात सर्पदंश व रेबीज प्रतिबंधक उपाययोजना, ग्रामीण रुग्णालयांतील औषध साठवणूक आणि आपत्कालीन आरोग्य सुविधा यावर चर्चा झाली. मात्र या चर्चेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड अनुपस्थित असल्याने अध्यक्ष वैद्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.डॉ. कोपूरवाड यांनी पुण्यातील बैठकीस जाण्यासाठी परवानगी मागितली होती. मात्र स्थायी समितीतील आरोग्य विभागाच्या महत्त्वाच्या विषयांचा विचार करून अध्यक्षांनी परवानगी नाकारली होती. तरीही आदेश धाब्यावर बसवत ते पुण्यास रवाना झाल्याने अध्यक्षांनी हा प्रकार गंभीर मानत कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दिले. 'शिवरत्न' सभागृहाला अटलजींचे नाव उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहाला भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह असे नामकरण करण्याचा ठराव सभागृहात मांडला. हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. विकासकामांवर भर बैठकीत विविध विभागांच्या विकासकामांचा आढावा घेताना कामांची गुणवत्ता, निधीचा योग्य वापर आणि पारदर्शकतेबाबत अधिक दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. शासनाच्या सर्व योजना शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.



पान नं २ वर...

दैनिक सोलापुरी झटका अंक Whatsapp वर वाचण्यासाठी आपला Whatsapp नंबर व नाव SMS करा. 9423235855 / 7219653255